# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.४

सभावृत्तांत

दिनांक ०३/०६/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०६/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ४. | मा. निता विलास पाडाळे | सदस्या |
| ५. | मा. श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ६. | मा. अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ७. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ८. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ९. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| १०. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. एस.टी. आव्हाळे, लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, एल.बी. जाधव, मा. विनय ओहोळ, मा. शिरीष पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य,मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. पोरेडी एस.डी, उपअभियंता, स्थापत्य, मा. नितीन कळसकर, कार्यालयीन अधिक्षक, मा. अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. रोकडे जयवंत, मा. वाकोडे ए.एम., मा. इदे ए.के. मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. सी.एस. मुठाळ, कनिष्ठ अभियंता,

नगररचना, मा.बी.एम. शेटे , कनिष्ठ अभियंता,बांधकाम परवानगी, मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. निलेश दाते, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. आर.एम. सौदाई, आरोग्य निरीक्षक, मा. सुनिल दुदुसकर , मा. सटाले, उद्यान सहाय्यक, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** काळेवाडी रहाटणी स.नं. १२६/१/१ येथे नाला हा मिळकतीमधुन गेला असून १२.०० मीटर डी.पी. रस्त्याला ऍप्रोच नसल्याने नाल्यावर सदर ठिकाणी आर.सी.सी. कल्व्हेट करणे

मा.श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर ,सदस्य ड प्रभाग समिती यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

दिनांक ३/६/२०१६ रोजीची सभा ड प्रभाग समितीचे सदस्यांची कोणतीही विकास कामे होत नसलेचे कारणास्तव तहकुब करुन सदरची सभा दिनांक १७ /०६ /२०१६ रोजी दुपारी १२.०० मा. आयुक्त सो. यांचे उपस्थितीत आयोजित करणेत यावी. सदर सुचनेस मा. श्रीमती विमल रमेश काळे यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा.सभापती यांनी आज दिनांक ०३/०६/२०१६ रोजीची ड प्रभाग समितीची माहे जुन महिन्याची सभा दिनांक १७/०६/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

सही/-
(अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/२५१/२०१६
दिनांक – ०४/०६/२०१६

**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ४

सभावृत्तांत

दिनांक १७/०६/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन महिन्याची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक १७/०६/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. अरुण मदन टाक | सभापती |
| २. मा. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ३. मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ४. मा. श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ५. मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ५. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ६. मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ७. मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ८. मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ९. मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

----------

याशिवाय, मा.विजय वाघमारे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. श्री. ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा.ए. टी.आव्हाळे, लेखाधिकारी,मा. एस. वाय. पाटील, मा. व्ही.बी. ओहोळ, मा. एल.बी. जाधव, एस.डी. पोरेडी, उपअिभयंता स्थापत्य, मा. रामनाथ टकले, मा. विजयसिंह भोसले. उपअभियंता बांधकाम परवानगी, मा. भाऊसाहेब साबळे,मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता,पाणीपुरवठा, मा. रवींद्र पवार, उप अभियंता, जलनि:सारण, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू, मा.कार्यालयीन अधिक्षक नितीन कळसकर, उपअभियंता, मा. अजय जाधव ,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. कलाल इ.के, मा. मोमीन ए.ए., मा. घेरडे ए.टी, मा. लोखंडे एस.एच.,मा. गजपुरे व्ही.पी, मा. श्रीमती कदम, मा. श्रीमती अजमिरे, कनिष्ठ अभियंता स्थापत्य, मा. मुलाणी बी.एम.,मा. इदे अनिल, मा. रोकडे जयवंत, मा. वाकोडे ए.एस.,कनिष्ठ

अभियंता, जलनि:सारण, मा.संदीप पाडवी, मा. दीक्षित अमिन ए, मा. साकेत पावरा, मा. निलेश दाते, मा. मोरमारे एस. व्ही. कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. राजेंद्र जगताप, मा. सी.एस. मुठाळ, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. ए.एच. नागडू, कनिष्ठ अभियंता, झोनिपू, मा. गेंगजे व्ही.एस. क्रीडा निरीक्षक, मा. सुनिल दुदुसकर,मा. जी.एन. खैरे, मा. दिलीप सटाले, उद्यान सहाय्यक, मा. कोतवडेकर एस. पी., मा. एस.ए. पाटील, मा. सरोदे बी.एस.,मा. सौदाई आर.एम. आरोग्य निरीक्षक, मा. माळी एस.के. आरोग्य निरीक्षक, पशू वैद्यकीय विभाग, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक, मा. कदम एम.एस. अतिक्रमण निरीक्षक इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ३ दिनांक ०६/०५/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ३ माहे मे २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे जुन २०१६ च्या कार्यपत्रिका क्र. ४ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. ८ विषय क्र. १

दिनांक १७/६/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दिनांक २९/४/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ मधील मयुरी रेसिडेन्सी येथील साईसदन येथे डी.पी. प्रमाणे रस्ता उपलब्ध असुन मयुरी रेसिडेन्सी येथील साईड मार्जिन साठी रस्ता उपलब्ध असुन सदर रस्ता साईसदन अपार्टमेंट ते आनंद हॉस्पिटल पर्यंत रस्ता वळवुन दुरुस्त करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ३/६/०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. ९ विषय क्र. २

दिनांक १७/६/२०१६ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. विनोद जयवंत नढे अनुमोदक : मा. राजेंद्र गणपतराव जगताप

संदर्भ : मा. विनोद जयवंत नढे यांचेकडील दिनांक ३/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी रहाटणी स.नं. १२६/१/1 येथे नाला हा मिळकतीमधुन गेला असून १२.०० मीटर डी.पी. रस्त्याला ॲप्रोच नसल्याने नाल्यावर सदर ठिकाणी आर.सी.सी. कल्व्हेट करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

**<u>क्रीडा विभाग</u>** :

मा. राजेंद्र जगताप : व्यायामशाळा साहित्याबाबत काय कार्यवाही क्रीडा विभागाकडून करण्यात येत आहे याबाबतची माहिती द्यावी. मागील दोन वर्षापासुन सदर बाबतची कार्यवाही क्रीडा विभागाकडून प्रलंबित आहे. या कामी श्री. गेंगजे क्रीडा निरीक्षक यांनी पाठपुरावा करावा.

**<u>मा. रामदास बोकड</u>** : व्यायामशाळेतील मॅटबद्दल काय कार्यवाही करण्यात आली .

**<u>मा. सभापती</u>**: क्रीडा विभागाकडून मध्यवर्ती भांडार विभागाला पत्र पाठवावे .

क्रीडा निरीक्षक श्री. गेंगजे : मध्यवर्ती भांडार विभागाकडील महापालिकेच्या ३१ व्यायामशाळांसाठी साहित्य खरेदीबाबतच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली असुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा निर्णय दिनांक २३/६/२०१६ पर्यंत कळेल. सदर प्रकरणी पाठपुरावा करण्यात येईल. तसेच भांडार विभागास पत्र देणेत येईल .

**<u>पाणीपुरवठा विभाग :</u>**

मा. राजेंद्र जगताप : प्रभाग क्र. ५७ येथे ८ ते १० लाख लीटर क्षमतेची पिण्याच्या पाण्यासाठी अंडरग्राऊंड टाकी उभारण्यात यावी. या साठी पिंपळे गुरव येथे जी टाकी आहे त्या शेजारी अंडरग्राऊंड टाकीचे काम करणेत यावे. किंवा शिरोळे यांची जागा मनपाच्या ताब्यात आली आहे तेथे सदर टाकीचे काम करावे. या कामी पाणीपुरवठा विभागाकडून प्रस्ताव सादर करणेत यावा.

उपअभियंता श्री. राजेंद्र जावळे: सद्यस्थितीत जागा ताब्यात नाही तसेच उद्यानाची जागा किंवा सध्याचे टाकीच्या जवळील जागा घेऊन तेथे अंडरग्राऊंड टाकी करता येईल. टाकी उभारणेच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**<u>आरोग्य विभाग</u>** :

**<u>मा. राजेंद्र जगताप</u>** : जलपर्णी काढण्याच्या कामाबाबत आरोग्य विभागाने माहिती द्यावी. सदर ठिकाणी डासांचे प्रमाण वाढते आहे तेथे फवारणी करण्यात यावी.

सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे :- पिंपळे सौदागर येथील नदीपात्रातील जलपर्णी काढण्याचे काम सुरु आहे. भाटनगर ते कासारवाडी येथील जलपर्णी काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. पूर्वी जलपर्णी काढण्याचे काम ठेकेदारास दिले होते परंतु आता महानगरपालिका कर्मचा-यांकडून सदर काम करवुन घेणेत येत आहे.

**<u>मा. वैशाली राहुल जवळकर</u>** : प्रभाग क्र. ५६ येथे झाडूवाले व कचरा गोळा करणा-या कर्मचा-यांच्या कामकाजात बदल नाही. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे यांनी गजाननगर येथील कर्मचा-यांची बदली करण्यात आली आहे अशी माहिती दिली.

**मा. नीता विलास पाडाळे** : बाजी प्रभू चौकात राडारोडा पडलेला आहे तो उचलण्यात आलेला नाही.

कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग : सदर रस्ता डी पी रस्ता असला तरी तो मनपाच्या ताब्यात नाही. रस्ता खाजगी मालकीचा असल्याने आरोग्य् विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**मा. नीता विलास पाडाळे** : प्रभाग क्र. ४७ मध्ये काही ठिकाणी चार दिवसातुन एकदा कचरा गाडी येते. काही ठिकाणी छोटी झाडे आहेत ती काढून टाकण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : सदर जागा खाजगी मालकीची असलेने जागा मालकांना याबाबत नोटीस देणेत येईल.

**मा. रामदास बोकड** : आरोग्य विभागाशी संबंधित मागील वर्षी झालेल्या ठरावावर अंमलबजावणी करणेकामी किती दिवसांचा कालावधी लागतो याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. तसेच सदर ठरावावर अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

मा. प्रशासन अधिकारी : प्रशासन विभागाकडून ठराव संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतो. सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : सदर बाबत स्थापत्य विभागाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता स्थापत्य : सदर विषयी आरोग्य विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात यावा त्यावर मा. आयुक्त सो. यांचे परवानगीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. रामदास बोकड** : आरोग्य विभागाचे कामात सुसुत्रता नाही. स्थानिक ठेकेदारांची नेमणुक करु नये.

**मा. विनोद नढे** : जगदाळे हॉस्पिटल या इमारतीच्या बेसमेंटमध्ये पाणी साचलेले असते. आरोग्य विभाग तसेच बांधकाम परवानगी यांचेकडील प्रलंबित काम आहे. साचलेल्या पाण्यामुळे डेंग्युचा प्रसार होतो. मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे : सदर इमारतीचे मालकांमध्ये अंतर्गत वाद आहे. सबब इमारत मालकास आरोग्य विभागाकडून नोटीस देणेत यावी. तसेच बांधकाम परवानगी विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

मा. टकले रामनाथ : सदर ठिकाणी स्थापत्य विभागाकडून मुरुम टाकण्यात यावा. बांधकाम परवानगी विभागाकडून पत्र देणेत येईल.

**अतिक्रमण विभाग** :

**मा. राजेंद्र जगताप** : आरक्षणाचे जागेवरील अतिक्रमण काढून टाकणे आवश्यक आहे.

फुटपाथवरील अतिक्रमणे काढणेची कारवाई प्रभावीपणे होत नाही.

पिंपळे गुरव येथील १८ मीटरचे १० किमी रस्ते असुन फुटपाथ चालणेकामी उपलब्ध होत नाहीत तेथे कारवाई होणे आवश्यक आहे.

**मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे** : अतिक्रमण पथकाचे काम समाधानकारक नाही . शनिवार व रविवारी रेनबो प्लाझा, कुणाल आयकॉन रोड या ठिकाणी नागरीकांसाठी फुटपाथ उपलब्ध नसतो. तेथे वॉकींग प्लाझा, सायकल ट्रॅक केले आहेत, ज्येष्ठ नागरीक, लहान मुलांना शाळेत घेऊन जाणारे पालकांना चालण्यासाठी फुटपाथवर जागा नाही कारण तेथे अतिक्रमणाने पूर्ण जागा व्यापली आहे. तेथील सर्व अतिक्रमणे काढण्यात

यावीत. १८ मीटर रस्त्यावरील एका फुटपाथ वर ५० पथारीवाले असतात. अतिक्रमण पथकाकडून कार्यवाही करण्यात यावी.

हॉकर्स झोनचे काम अपूर्ण आहे.

**मा. शिवाजी पाडुळे** : अतिक्रमणाचे प्रश्नावर प्रशासनाने तातडीने कारवाई करुन फुटपाथ मोकळे करावेत

मा. रामदास बोकड : नाशिक फाटा उड्डाणपूल ते सांगवी फाटा येथील १२ मीटर डी पी रोडवर , आरक्षणांच्या जागांवर अनधिकृत पार्कींग करण्यात येते. त्यांचेवर कारवाई करणेत येत नाही. खाजगी बसेस सदर ठिकाणी उभ्या करण्यात येतात. याबाबत आरटीओ व वाहतुक पोलीस शाखेस मनपाकडून पत्रव्यवहार करण्यात यावा. तसेच सृष्टी चौक, सुदर्शननगर, कृष्णा चौक येथे १८ मीटर रस्ते झाले आहेत परंतु अर्धे रस्ते अतिक्रमणग्रस्त आहेत. तरी अतिक्रमणे काढण्याबाबत कारवाई प्रभावीपणे व्हावी.

प्रशासन अधिकारी श्री. वाघमारे : खाजगी वाहनांचे पार्कींगबाबत आरटीओ व वाहतुक पोलीस यांचेशी पत्रव्यवहार करणेत येईल.

**मा. वैशाली राहुल जवळकर** : हॉकर्स झोनचे काम पूर्ण झालेले नाही.

सदर बाबत मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे यांनी हॉकर्स झोनचे काम अंतिम टप्प्यात आहे. अद्याप हॉकर्स झोनचे लाभार्थ्यांची नावे निश्चित केलेली नाहीत.

**अनधिकृत बांधकाम निर्मुलन तथा बांधकाम परवानगी विभाग**:

**मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे** : खाजगी मालकीच्या इमारतीतील स्वत:चे पार्किंगमध्ये बदल न करता इतर पार्किंग जागेमध्ये काही बदल केले आहेत त्याबाबत अनधिकृत बांधकाम निर्मुलन तथा बांधकाम परवानगी विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

उपअभियंता श्री. विजयसिंह भोसले : कारवाई करण्यात येईल.

**स्थापत्य विभाग** :

**मा. राजेंद्र जगताप** : काटे पुरम येथील रस्त्याचे काम करता येईल किंवा कसे? तेथे पत्राशेड झालेल्या आहेत. त्या काढण्याची कारवाई बांधकाम परवानगी विभागामार्फत करण्यात यावी.

उपअभियंता श्री. पोरेडी : सदर जागेबाबत मा. न्यायालयाने जागा ताब्यात घेऊन नंतरच कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत त्यामुळे जागा ताब्यात नसल्याने पुढील कार्यवाही करता येत नाही.

उपअभियंता, श्री. विजयसिंह भोसले : बांधकाम परवानगी विभागाकडून कारवाई करणेत येईल.

**विद्युत विभाग**

**मा. रामदास बोकड** : महावितरण कंपनीचे अधिकारी यांचे काम योग्य नाही. डीपीची झाकणे बसविण्याचे काम अपूर्ण आहे. भूमिगत केबलचे काम बंद आहे. बीव्हीजी कंपनीचे काम योग्य् नाही. महावितरण व बीव्हीजीचे अधिकारी यांना पुढील बैठकीस बोलवण्यात यावे. तसेच सदर कामासाठी किती निधी ठेवण्यात आला आहे , किती खर्च झाला आहे याबाबतची माहिती पुढील बैठकीचे वेळी मिळावी.

जलनि:सारण विभाग :

**<u>मा. नीता विलास पाडाळे</u>** : प्रभाग क्र. ४७ मध्ये ड्रेनेजचे चोक अप काढण्यासाठी ज्या परिसरात वाहन जाऊ शकत नाही त्या ठिकाणी तेथील ड्रेनेज सफाईचे काम manually करुन घेणेत यावे.

उपअभियंता, जलनि:सारण : कारवाई करुन घेणेत येईल.

**<u>मा. शिवाजी पाडुळे</u>** : सध्या पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाण्याचा विचार करता पाणी काटकसरीने वापरणेबाबत आवाहन करतो. कचरा, नाले सफाई याबाबत सदस्यांनी तक्रारी मांडल्या आहेत त्याबाबत अधिका-यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. भटक्या कुत्र्यांचे उपद्रवाबाबत पशू वैद्यकीय विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही व्हावी.

**<u>मा. सभापती</u>** :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन, सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे जुन २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

(विजय वाघमारे)

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२५८/२०१६

दिनांक – २९/०६/२०१६